# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 12-08-2022**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-08-12 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-08-13 | 2022-08-14 | 2022-08-15 | 2022-08-16 | 2022-08-17 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 6.3 | 4.6 | 13.1 | 66.5 | 16.2 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.1 | 27.9 | 27.5 | 27.4 | 27.3 |
| किमान तापमान (अं.से) | 24.1 | 24.2 | 24.4 | 24.5 | 24.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 87 | 86 | 88 | 89 | 88 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 84 | 83 | 85 | 86 | 84 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 9.0 | 8.0 | 8.0 | 9.0 | 8.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 259 | 289 | 286 | 244 | 252 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 5 | 7 | 7 | 7 | 5 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• कामठी तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक१३ ते १७ ऑगस्ट २०२२ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • पुढील पाच दिवस तालुक्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक १३ व १४ ऑगस्ट २०२२ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यतावर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भ उपविभागामध्येदिनांक १७ ऑगस्ट २०२२ ते २३ ऑगस्ट २०२२ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस आणि कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता कृषी रसायनांची फवारणीकामे पुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना वाफसा अवस्थेत करावी. • कपाशी, सोयाबीन, मुग, उडीद, तूर, संत्रा, मोसंबी, लिंबू व अन्य हंगामी, फळ पिके व भाजीपाला पिकामध्ये पाणी साचू नये या साठी सऱ्या फोडाव्या. • शेतकरी, शेत मजूर यांनी नदी नाल्यावरून पाणी वाहत असल्यास रस्ता ओलांडतांना घाई करू नये तसेच आपली इतर जनावरे वाहत्या पाण्यातून जाणार नाही याची दक्षता घ्यावी. • पुढील २ दिवस विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे.स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.शेतातील अति महत्वाची कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे.शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे.शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा.शेतकरी व शेतमजूर यांनी झाडाखाली आसरा घेणे टाळावे तसेच जनावरांचा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • कपाशी, सोयाबीन, मुग, उडीद, तूर, संत्रा, मोसंबी, लिंबू व अन्य हंगामी, फळ पिके व भाजीपाला पिकामध्ये पाणी साचू नये या साठी सऱ्या फोडाव्या. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • मर आणि मूळकूज रोग लक्षणे आढळलेल्या शेतात, रोगग्रस्त रोपाच्या सुरुवातीच्या काळात व निरोगी रोपांच्या बाजूस रोग व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून मुळापर्यंत जाईल अशी आळवणी (ड्रेंचींग) करावी. • कपाशी पिकामध्ये आकस्मिक मर च्या व्यवस्थापनासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २० ग्राम + १०० ग्राम युरिया प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पिक ओळीमध्ये आळवणी (ड्रेंचींग) करावी. • कपाशी पिकामध्ये रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ८० ग्रॅम किंवा डायनोटेफ्युरोन २० एसजी @ ६० ग्रॅम प्रती एकर किंवा थायमेथॉक्सम २५ डब्ल्यूजी @ ४० ग्रॅम/एकर या किटकनाशकाची स्वच्छ हवामान असताना व वाफसा परिस्थितीत असताना करावी. गुलाबी बोंडअळीचे निरीक्षण करण्यासाठी, शेतात 2 कामगंध सापळे प्रती एकर लावावे व कपाशीवर निंबोळी अर्क 5% किंवा निंबोळी तेल ५ मिली प्रती १ लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| सोयाबीन | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • सोयाबीन पिकामध्ये पिवळा मोझेक विषाणू या रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशी या किडीच्या प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. • शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत. • सोयाबीन पिकामध्ये तंबाखूची पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी कीड निहाय कामगंध सापळे लावावे. या सापळ्यांमध्ये ५ ते १० प्रौढ पतंग आढळल्यास, पिकामध्ये या किडीच्या प्रादुर्भावाची प्रारंभिक अवस्था दर्शवते • सोयाबीन पिकामध्ये चक्रीभुंगा व पाने खाणाऱ्या अळ्यांच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली मिली/हेक्टर) किंवा थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर या प्रमाणात स्वच्छ हवामान परिथिती असताना फवारणी करावी. |
| तूर | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| मुग | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| उडीद | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | • पावसाचे पाणी शेतात साचून राहू नये यासाठी साऱ्या फोडाव्या तसेच पिकाच्या शेतात साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. |
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |